# "दिग्गज रंगकर्मींच्या कलाप्रक्रियेचा वेध"

## श्री योगेश तडवळकर यांचे ऑनलाईन व्याख्यान / संवाद सत्र
## ७ ऑक्टोबर २०२० रोजी सायंकाळी ५:३० वाजता

*विद्यालंकार ज्ञानपीठ ट्रस्ट ने आयोजित केलेल्या अभिनव व्याख्यानमालेत/ संवादमालेत दिग्गज रंगकर्मींच्या कलाप्रक्रियेचा वेध या संवाद सत्रात मराठी अभिनेते, कलावंत, दिग्दर्शक श्री योगेश तडवळकर यांनी "रंगपंढरी" हा महत्वाकांक्षी प्रकल्प कोणताही व्यावसायिक हेतू न ठेवता, स्वखर्चाने उभा केला. योगेश सर "रंगपंढरी" नावाचे स्वतःचे यू ट्यूब चॅनेल चालवतात. हे चॅनेल मराठी रंगभूमी वरील दिग्गज कलावंताच्या सर्जनशील प्रक्रियेच्या मौल्यवान ज्ञानाचा दुर्मिळ दृकश्राव्य दस्तऐवज असून, लेखकापासून प्रेक्षकांपर्यंतच्या कलाकृतीचा प्रवास खूपच प्रेरक आहे. नवोदित कलावंतांना, दिग्दर्शकांना, रसिकांना नाटक रंगमंचावर येईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया, त्यातील टप्पे, त्यामागील विचार, संकल्पना, व्यक्तिरेखेची निवड, व्यक्तिचित्रण, बारकावे, वैशिष्ट्ये, शक्तिस्थळं, पात्रांची उभारणी, निरीक्षणं, अविर्भाव, भावविश्व, सामाजिक जडणघडण, तयारी, संहिता, वाचन, पाठांतर, संवाद, आवाज, तालिमी, चर्चा, श्वासाचा, नवरसांचा वापर, इतर कलाकारांबरोबरचा ताळमेळ, देहबोली, वेशभूषा, रंगभूषा, नेपथ्य याबद्दल स्पष्टता प्रदान करणे, हेच त्यांच्या उपक्रमाचे उद्दीष्ट आहे.*

### वेगवेगळ्या क्षेत्रात प्रवेश

एकाच क्षेत्रात राहून साचलेपण जाणवतो, अंतर्भूत कलागुणांना वाव मिळावा या हेतूने योगेश सरांनी विविध क्षेत्रात पाऊल टाकले, सर्जनशीलता, कल्पनाशीलता, संकल्पना विकसित होतील असे अनेक क्षेत्र त्यांना खुणावत होती. त्यांनी सनदी लेखापाल म्हणून काही वर्षे काम केले, कॉपी टेस्टिंग चे प्रशिक्षण घेऊन जाहिरात कंपनी सुरु केली, स्टॅनफोर्ड विद्यापीठाने प्रमाणित ह्यूमन कॉम्पुटर इंटरएक्शनचा अभ्यास पूर्ण केला. सिंगापूर येथे अर्गोनॉमिक्स चा प्रमाणित अभ्यास पूर्ण केला, सध्या ते सुप्रसिद्ध एर्गोनोमिस्ट आहेत. सिंगापूरमधील त्यांच्या कंपन्या सिनर्गो कन्सल्टिंग चे संचालक, व माईंड लेन्स वर्ल्डवाइड चे सहसंस्थापक आणि संचालक असून ॲपल, एक्सॉन मोबाईल आणि शेल यासारख्या अग्रगण्य कंपन्यांना जगभर सेवा पुरवतात. मानव-संगणक संवाद, वर्क स्पेस अर्गोनॉमिक्स आणि प्रॉडक्शन आयडिएशन आणि इनोव्हेशनमध्ये योगेश सर जाणते तज्ञ आहेत, सोबतच जाहिराती, अभिनय, कार्यव्यवस्थापन, कॉपीराइट अशा क्षेत्रात विशेष लौकिक मिळवला आहे., महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सुरु केलेल्या अजिंठा वेरूळ मोहिमेत हिरारीने भाग घेतला, आजवर अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.

### रंगपंढरी - महत्वाकांक्षी प्रकल्प

तीन पिढ्यांचे चाळीसहून अधिक जेष्ठ, सुप्रसिद्ध कलावंत, दिग्दर्शक यांच्या विचारांची घट्ट वीण बांधून, प्रत्येकाकडून त्यांच्या मनांतील नाटक घडण्याची प्रक्रिया समजून, ती नवीन पिढीपर्यंत पोचवण्याचे काम रंगपंढरी ने केले. रंगपंढरी नावामागील विचार सुद्धा तितकाच महत्वाचा आहे. रंगदेवता हे कलावंताचे दैवत, विठ्ठल असतो, सर्व कलावंत वारकरी असतात, त्यात सहजतेची, उत्स्फूर्ततेची, भक्तीची, कलाप्रेमाची भावना असते, हा नितांतसुंदर सोहळा पाहण्याचे भाग्य लाभते ते साजरे रूप रंगपंढरी. सर्वजण नाट्यकलेच्या प्रेमामुळे, श्रद्धेमुळे एका समान धाग्यात जोडलेले असतात या सर्व थोर कलावंतांकडून नक्कीच खूप काही शिकण्यासारखे असते, त्यामुळे हे ज्ञानाचे, अनुभवाचे संप्पन भांडार जनसामान्यापर्यंत, रसिकांपर्यंत, साधकांपर्यंत पोहचवावे ह्या एकमेव प्रामाणिक तळमळीतूनच योगेश सरांनी निस्वार्थ भावनेनं रंगपंढरीची निर्मिती केली, या अभिनव संकल्पनेतून असंख्य रसिकांना, नवोदित रंगकर्मींना, भावी पिढयांना उपयुक्त ठरेल असा अत्यंत मौल्यवान ठेवा भेट दिला. दस्तऐवज आणि संप्रेषण ह्या महत्वाच्या नोंदी केल्या. "रंगपंढरी" यू ट्यूब चॅनल वर प्रदर्शित केल्यामुळे आबालवृद्धांना कोणत्याही

भोगौलिक, आर्थिक बंधनांशिवाय कलाकृतीचा आस्वाद घेता येतो, आजवर पस्तीस देशातील दीड कोटी पेक्षा अधिक रसिकांनी रंगपंढरीचा पहिला भाग पाहिला आहे.

**अष्टपैलूत्व आणि अनुभवकथन**

योगेश सरांना लहानपणापासून नाटकाची आवड होती, शाळेत असतांना त्यांनी बालनाट्य स्पर्धेत सहभाग घेतला. शालेय शिक्षणानंतरच मराठी सोबतच हिंदी रंगभूमीवर काम केले. गेल्या २० वर्षांपासून त्यांनी भारत आणि सिंगापूरमध्ये विविध प्रकारच्या प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकांत अभिनय आणि दिग्दर्शनाचे काम केले. त्यांच्या कल्पकतेतून "रंगपंढरी" उदयास आले, आपले काम प्रवाही हवे, नाविन्याची कास हवी, कल्पकता हवी, आनंद निर्माण करता यायला हवा, मिळायला हवा, कामात झोकून देण्याची वृत्ती हवी, काम श्रद्धेने करायला हवे, यातून योगेश सरांचे या प्रकल्पासाठीचे झपाटलेपण दृष्टीस पडते. भारत आणि सिंगापूर येथील बऱ्याच चित्रपट महोत्सवात त्यांनी सहभाग घेतला. रंगपंढरी प्रकल्प साकारतानाचे अनुभव, त्यांनी अतिशय नेटकेपणे मांडले. विक्रम गोखले यांनी केलेल्या कौतुका पासून मुक्ता बर्वे यांच्या व्यावहारिक सुचनेपर्यंत खुसखुशीत प्रसंग, महत्वपूर्ण आठवणी जागवल्या. त्यात सागर देशमुख, अमोल पालेकर, संजय मोने, यांच्या गुणग्राही स्वभावाचं दर्शन अंतर्भूत आहे. या विशेष संवादातून योगेश सरांचे बहुआयामी, अष्टपैलू व्यक्तिमत्व उलगडले. त्यांच्या हरहुन्नरी स्वभावाचा, कल्पकतेचा, प्रतिभेचा, आणि प्रयोगशीलतेचा प्रत्यय येतो.

**महत्वाचे मुद्दे**

कुठलाही व्यावसायिक हेतू न बाळगता योगेश सरांनी रंगपंढरीची भव्य निर्मिती केली, सर्वच मान्यवर रंगकर्मी, रंगपंढरीच्या वारीत सहभागी झाले, मनमोकळेपणाने त्यांचे विचार, ज्ञान, अनुभव सर्वासाठी खुलं केलं. संगीतकार कौशल इनामदार, प्रतिमा कुलकर्णी, मधुराणी प्रभुलकर, तंत्रज्ञ आणि यांत सहभागी असणाऱ्या प्रत्येकाबद्दल योगेश सरांनी कृतज्ञता व्यक्त केली. प्रत्येक मुलाखत ४ -५ तास चालायची, सर्वच फेस टू फेस मुलाखती हार्ट टू हार्ट झाल्यात, सर्वच मुलाखती अत्यंत चिकाटीने, कुशलतेने आणि बारकाईने केल्या आहेत, प्रत्येक मुलाखतीत कामाचा ध्यास, सकारात्मकता, स्निग्धता आणि आपलेपणा जाणवतो. रंगपंढरीच्या लोगोत कलात्मकता आणि सौन्दर्यदृष्टी लक्षात येते, समोरच्याला जे समजेल त्यावरच तुमचे प्राक्तन अवलंबून असल्याने उत्तम संभाषण कौशल्य, संकल्पनेची तयारी, मांडणी, सादरीकरण अत्यावश्यकच असते. प्रत्येकाकडून नक्कीच काहीतरी उपयुक्त शिकता येते. सळसळते चैतन्य, चाळीसहून अधिक रंगकर्मी, संपूर्ण टीम आणि रसिकप्रेक्षक हे रंगपंढरी च्या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार आहेत. अचंभित करणारं वैविध्य आणि थक्क करणारी ऊर्जा घेऊन उभी राहते ती रंगपंढरी, अद्भुत, अप्रतिम, अवर्णनीय, शब्दातीत.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अमित ओक सर यांनी श्री योगेश तडवळकर सरांची मुलाखत घेतली, अखेरीस प्रा. तृप्ती नाईक यांनी पाहुण्यांचे, उपस्थितांचे आभार मानले.

संकलन - विद्यालंकार इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजि चे प्रा.अंबादास देशमुख, प्रा.अजितकुमार खाचणे, प्रा.प्रणिता पाध्ये, आणि प्रा.प्रवीण पाटील.